# मानसीच्या ध्यानी, मनी ---
# ‘आली ठुमकत’ लावणी

आले मानसीच्या मनी आणि धुंद झाली ती लावणी हा रोमहर्षक प्रत्यय देणारी २४ ऑक्टोबर ही लावणीनृत्य-संध्या आयोजित करणाऱ्या न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. कोजागिरी पौर्णिमेच्या या संध्याकाळी, चंद्राच्या स्वागतार्थ मधु मंगेश कर्णिकांच्या शब्दात "आकाश, चांदण्यांचा भरगच्च गजरा लेवून अभिसारिकेसारखे सजत होते." या अभिसारिकेबरोबर स्पर्धा करण्याची तयारी करण्यासाठी मानसी व तिच्या नर्तिका मैत्रिणीही वस्त्रभूषणे, गजरे व प्रसाधनांच्या गर्दीत हरवून गेल्या होत्या. मानसी-कन्या श्वेताने, श्वेत रंगात दडलेले इंद्रधनुचे लोभस रंग नर्तिकांच्या चेहऱ्यांवर कुशलतेने सजविले. रंगमंच-सजावट, प्रकाश-योजना व ध्वनिसंयोजनाची सिद्धता झाली. हॉलच्या दर्शनी भागात जरीकाठी रेशमी साड्यांची, कनातीचा आभास देणारी सुरुचीपूर्ण सजावट केली गेली व रंगीबेरंगी भिरभिरी प्रेक्षकांच्या मनाला जत्रेत फिरवू लागली. जरीकाठी परकर-पोलके लेवून, चिमुकल्या हातात वर्खाच्या हातभर बांगड्या घातलेल्या गोऱ्यापान चिमुरडीला पाहिले व वाटले, वातावरण-निर्मिती खरोखरी झकास साधली आहे.

स्थानापन्न झालेल्या प्रेक्षकांच्या उत्सुक नजरांना झेलीत, ताशा, ढोलकी, डफ, तुणतुण्याच्या जल्लोषात वाद्यवृंदाने रंगमंचावर प्रवेश केला. प्रल्हाद केशव अत्र्यांचे शब्द "महाराष्ट्राचा पिंडच मुळी बंडाचा. झुणका-भाकरी हे खाद्यातील बंड व डफ तुणतुणे हे वाद्यातील बंड" सार्थ करण्यासाठी ही बंडखोर कलावंत मंडळी, कलाप्रदर्शनासाठी सिद्ध झाली. ताल व सप्तसुरांची सोबत करण्यासाठी कोजागिरीचे चांदणे, नृत्यांगनांच्या रूपाने रंगमंचावर उतरले व रंगदेवतेला मुजरा करीत, लावणीच्या ठेक्याचा आवाका किती मोठा आहे याची हृद्य प्रचीती देणारा ‘मानसी आर्ट्स’ संस्थेचा लावणी नृत्यनाट्याचा बहारदार कार्यक्रम सुरू झाला.

लेखक क्षितिज झारापकरांनी ‘आले पूर्वेचे क्षितिज पश्चिमेच्या अंगणात’ या सूत्रावर अर्थपूर्ण संवाद बेतून, अचूक संवादफेक करणाऱ्या हौशी अभिनेत्यांना रंगमंचावर उभे केले. संवादांनी गवळणींना साद घातली, ढोलकी व डफावर दणदणीत थाप पडली व आपोआप प्रेक्षकांच्या टाळ्यांचा ठेका वादकांच्या कलावंती बोटांची संगत करू लागला. प्रणयभावना जेव्हा शृंगाररसाचे आकंठ पान करू लागतात तेव्हा लावणीचे बोल कलमबद्ध होतात, हे पटवून देणाऱ्या लावण्यांच्या बोलांना नृत्यांगनांच्या घुंगरांचे पदन्यास साथ देऊ लागले. प्रत्येक नृत्यानंतर, हातात जीव असला की टाळ्यांचा कडकडाट कसा मेघांच्या गडगडाटाबरोबर स्पर्धा करू शकतो याचा प्रत्यय येऊ लागला व वातावरण मदहोष होऊ लागले. पॅरिसच्या दिशेने पाहणाऱ्या फॅशन डिझायनर्सनी, निदान एकवेळ, मराठी, पारंपरिक, पायघोळ भरजरी, रेशमी, बुट्टेदार नऊवारी शालूच्या अवगुंठनात सजलेल्या, मराठी स्त्रीच्या मनमोहक, शालीन रूपाला दाद जरूर द्यावी इतपत वेषभूषा देखणी होती. कमालीचे कलापूर्ण नृत्य-दिग्दर्शन व दर्जेदार निर्देशन प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त पसंतीचे कारण ठरले.

संमोहिनी, मनमोहिनी लावणी, नर्तिकांची लाजवाब अदाकारी, सुरांची कामगिरी, तालवाद्ये, तंतुवाद्याच्या लयकारीने मराठी संस्कृतीच्या महावस्त्रावर अनोखी कशीदाकारी केली. महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैशिष्ट्य मानल्या गेलेल्या 'लावणी-नृत्या'ला पश्चिमी रंगमंचावर, स्वतःच्या आगळ्यावेगळ्या अंदाजात सादर करणाऱ्या सौ. मानसी करंदीकरांचे मनःपूर्वक अभिनंदन. कर्जत रेल्वे-स्थानकावर, मुंबईच्या धामाधूम करणाऱ्या हवेत, मनाला आल्हाद देणारी ताज्या सुगंधी मोगऱ्याच्या फुलांची टोपली हातात धरून गजरे विकणारी स्त्री पाहिली. त्या पार्श्वभूमीवर, मराठी लावणीने, परंपरांचे कर्ज फेडण्याचा सौरभित प्रयास केला आहे, याची मनाने कबुली दिली. येथील 'रूटीन'मध्ये, अशी मोगऱ्याची सुगंधी फुले मराठी मनाला नजर करणाऱ्या सर्व हौशी मंडळींचे आभार मानते.

लावणीच्या जबरदस्त ठेक्यावर शकीराच्या गाण्याचे कलम करून, 'रिमिक्स, थ्री इन वन, फोर इन वन' चा जमाना आहे हे दाखविण्याच्या अभिनव प्रयोगाचे प्रात्यक्षिक करीत, लावणी, भांगडा व रॅप-म्युझिकच्या तालावर, गवळणींच्या गर्दीत एकमेव, आकर्षक नर्तक जोमाने नाचला. घुंगरांचे बोल दमले नाहीत, टाळ्या वाजविणारे हात थकले नाहीत व एका अनाम उत्साहात या बहारदार कार्यक्रमाची सांगता झाली. सौ. मानसीच्या कलागुणांनी व तिच्या पायांतील घुंगरांच्या झणकारांनी मला व रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सौ. मानसी मोहन करंदीकर व त्यांच्या गुणवंत, कलावंत सहयोग्यांचे त्रिवार अभिनंदन, व त्यांच्या मराठी परंपरा जपण्याच्या खास अभिनिवेशाला माझा मानाचा मुजरा.

न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाचे उत्साही अध्यक्ष श्री. निशांत बागुल व त्यांच्या साथीदारांचे, अक्षरशः घरचे कार्य आहे या थाटाचे घरगुती अगत्य अनुभविले. पिस्तेकाजूबदाममिश्रित केशरी दुधाची चव ओठांवर रेंगाळत असताना, कोजागिरीचे चांदणे सोबतीला घेऊन प्रेक्षक घराकडे परतले. परतीच्या वाटेवर माझ्या मनात विचार आला, येथून पुढे जेव्हा लावणीच्या बोलांना एकाकी वाटेल, घुंगरांच्या तालावर नृत्य करून एकाकीपण संपवावेसे वाटेल तेव्हा लावणीच्या हृदयाचे ओठ गुणगुणू लागतील -

'कोणी तरी बोलवा मानसीला'.

**उषादेवी विजय कोल्हटकर**